

# 'तथापि'चा जिव्हाळा

प्रिय साथी,

आरोग्य विविध घटकांवर अवलंबून असतं. खासकरुन स्त्रियांचं आरोग्य. एखाद्या व्यक्तीला आरोग्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या घटकांचा लाभ घेता येतो का नाही यावर आरोग्य ठरतं. जसं, पुरेसं पोषक अन्न, वस्त्र, निवारा आणि हाताला काम. खासकरुन आदिवासी, दलित आणि गरीब कुटुंबातील स्त्रियांना आरोग्यासाठी आवश्यक घटकांच्या कमतरतेमुळे गंभीर परिणाम भोगावे लागतात. आणि हेच महाराष्ट्रात दिसत आहे.

स्त्रियांवरचा वाढता हिंसाचार, पुरुषांमधली दारु आणि जुगाराची वाढती व्यसनं, लैंगिक छळ, मुलीचा गर्भ पाडण्यासाठी सोनोग्राफी तंत्राचा वाढता गैरवापर, वाढत्या सिझेरियन शस्त्रक्रिया, नसबंदी आणि गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रिया या सर्वांचा स्त्रियांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. भोवतालची व्यापक सामाजिक आणि आर्थिक स्थिती या सगळ्याला खतपाणी घालत असेल तर ती आपल्याला तपासून पहायला लागेल. उदा. खाजगी क्षेत्रातल्या डॉक्टरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारचं सरकारी धोरण नाही. अशा परिस्थितीत सरकारी आरोग्यसेवांची भूमिका अजूनच महत्त्वाची ठरते. सर्वांसाठी कार्यक्षम आणि संवेदनशील आरोग्य सेवा असणं म्हणूनच फार निकडीचं आहे.

जिव्हाळ्याच्या या अंकातले वेगवेगळे अहवाल स्त्रियांच्या आरोग्यसेवांची दुर्दशा दाखवतात. प्रजनन आरोग्य, गर्भपात, रक्तपांढरीसाठी आणि हिंसाचारासाठी आवश्यक सुविधांचं प्रमाण खूपच खालावलेलं आहे.

२६ जून हा दिवस जागतिक छळणूकविरोधी दिवस (World Day against Torture) म्हणून पाळला जातो. सीडॉच्या देखरेखीमधून आलेले हिंसाचाराबाबते अहवाल खासकरुन धक्कादायक आहेत. हिंसाचाराचे विचित्र प्रकार अगदी दूरवरच्या गडचिरोलीमधून आणि तितक्याच जवळच्या चिपळूण आणि मुंबईतून समोर आले आहेत. बऱ्याच जिल्ह्यांमधून संशय घेणे या प्रकारचा हिंसाचार नोंदवला गेला आहे. यातनं काय दिसतं? अशा हिंसेतून स्त्रियांवरची बंधनं आणि नियंत्रण वाढतंय का? हे अजून खोलात जाऊन पाहणं गरजेचं आहे. सांगली जिल्ह्यातल्या कहाण्या एकीकडे त्यातल्या क्रूरतेने हादरवून टाकतात तर दुसरीकडे हिंसाचाराचा मुकाबला करण्याचं धाडसही दाखवतात. परत एकदा या सर्वात आरोग्य सेवांची भूमिका काय हा प्रश्न पडतो. सध्या तरी कोरी पाटी इतकंच उत्तर दिसतंय.

तुमचे विचार, सूचना आम्हाला जरुर कळवा

आपली , तथापि टीम

अंतरंग


- मागोवा ... दुष्काळ आणि स्त्रियांचं आरोग्य २
- आरोग्य सेवांचा हक्क ... ४
- नेहमीचे आजार... शेवगा ५
- आंतरराष्ट्रीय महिला स्वास्थ्य कृती दिन ६
- गर्भनिरोधकांचीओळख ८
- गर्भपातासंबंधी शासन निर्णय १०
- माहितीच्या जगात... ११
- खोकली माय (कविता).... १२

# दुष्काळ आणि स्त्रियांचं आरोग्य

दलित महिला विकास मंडळ, सातारा. लेखन- मेधा काळे

सलग ४-५ वर्षं पाऊस पडलेला नाही आणि अखेर या वर्षी महाराष्ट्रातल्या ७१ तालुक्यातली १२,४८५ गावं दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झाली. यामध्ये पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातल्या ११ जिल्ह्यांचा समावेश आहे. संपूर्ण राज्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत ११ लाख लोक काम करत आहेत आणि फक्त पश्चिम महाराष्ट्रात ४,७४,०० जनावरं चारा छावण्यांच्या आधारावर जिवंत आहेत.

सरकारने जाहीर केलेली मदत, त्यात काही भागांना दिलेलं झुकतं माप, पाणी धोरण, दुष्काळ निवारण आणि नियोजनाच्या बातम्यांमधून पुढे न आलेलं एक चित्र या लेखातून मांडत आहोत.

दुष्काळामध्ये तग धरता यावी म्हणून रोहयोवर काम करुन कसंबसं आपलं पोट भरणाऱ्या लाखो लोकांचे हे काही अनुभव.



बिजवाडी, ता. माण, सातारा

संपत काळे, एनकंस, २००४

पिसर्वे, ता. पुरंदर - रोहयोवर काम करताना एका महिलेला खडी फोडताना डोळ्याला इजा झाली. इजा गंभीर होती म्हणून ससूनमध्ये दाखल केलं. उपचार होणार नाहीत असं सांगितल्यामुळे खाजगी दवाखान्यात ४०,००० रु. भरावे लागले. या सगळ्यानंतर घरदार तर गेलंच पण डोळाही निकामी झाला. (लोकसत्ता ८ मार्च २००४)

आष्टी, ता. बीड - टँकरचं गढूळ पाणी प्यायल्याने गॅस्ट्रो, काविळीची साथ आली आहे. स्वच्छ पाणी न मिळाल्याने रोज मूतखड्याचे ३-४ रुग्ण दवाखान्यात येतात असा डॉक्टरांचा अनुभव. खाजगी डॉक्टर रोजच्या २५रु. मजुरीतले २० रु. उपचारासाठी घेत आहेत. (लोकसत्ता, ५ मे २००४)

माळकरंजा, ता.बीड - सावलीची सोय नसल्याने सहा महिन्याच्या मुलीला विहिरीजवळ झोपवून लोमटे पती पत्नी कामासाठी गेले. सोबत तिचा दीड वर्षाचा भाऊ होता. दिवसभरात मुलगी विहिरीत पडून गेली. या धक्क्यातून तिची आई अजून सावरलेली नाही. (लोकसत्ता, १५ मे २००४)

कुठल्याही आपत्तीचे सर्वात जास्त परिणाम स्त्रियांना भोगावे लागतात हे वास्तव आहे. म्हणूनच साताऱ्याच्या दलित महिला विकास मंडळ आणि युक्रांद या संघटनांनी ३ गावांमधून ५ रोहयो कामावरील एकूण १६६ महिलांशी बोलून त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यात खासकरुन त्यांच्या आरोग्याची आणि आरोग्यसेवांची पाहणी केली. तथापि आणि इतर संस्थांसोबत सीडॉ कराराच्या आरोग्य अधिकाराबाबतच्या कलम १२ च्या देखरेखीचा एक भाग म्हणून ही पाहणी करण्यात आली. यासाठी सातारा सार्वजनिक रुग्णालयाच्या स्त्री रोग तज्ज्ञांनी कामांवर जाऊन बायकांची तपासणी केली हे विशेष.

बायकांचा दिवसातला बहुतेक वेळ हा टँकरने गावात आलेलं पाणी आणण्यात जातो. किमान दीड कि.मी. चालत जाऊन दिवसाकाठी सुमारे ७ ते १५ हंडे पाणी आणावं लागतं. पाणी भरुन आणि घरची सगळी कामं उरकून रोहयोच्या कामावर ३-४ कि.मी. चालत जावं लागतं. घरी परतेपर्यंत साधारण १० तास जातात. रोहयोखाली मजुरी ५ ते २५ रु. मिळते. उरलेली मजुरी गव्हाच्या स्वरुपात. पण तीही वेळेवर नाही. या परिस्थितीत बायांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम झालेले दिसतात.

या पाहणीत १६६ बायांपैकी १२५ जणींनी प्रजनन आरोग्याची काही ना काही समस्या सांगितली. ११२ जणींनी पाळीची आणि अंगावरुन पांढरं जाण्याची तक्रार सांगितली तर १३ जणींनी अंग बाहेर आल्याचं सांगितलं. १४० जणींनी अशक्तपणा तर जवळजवळ तितक्याच म्हणजे १३६ जणींनी सांधेदुखी - मानदुखीची तक्रार सांगितली. अशा परिस्थितीतही या बाया दिवसातले १० तास अंगमेहनतीची कामं करत आहेत. आणि त्यांच्या कुठल्याच आजारासाठी आरोग्यसेवा, मदत उपलब्ध नाही.



संपत काळे, एनकॅस, २००४

कामावर साधी सावलीचीही सोय नाही. दिवसभर स्वतःच खोदलेल्या खड्ड्यात बसून जेवायला लागतं.
गौडवाडी, ता. सांगोला, सोलापूर

या समस्यांसाठी बाया उपचार कुठे घेतात हे विचारल्यावर लक्षात आलं की सर्वात जास्त म्हणजे ४७ टक्के महिला खाजगी दवाखान्यात उपाचारासाठी जातात. त्या खालोखाल ३३ टक्के महिला घरगुती उपचारावर भागवतात आणि सर्वात कमी म्हणजे फक्त २० टक्के महिला प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घेतात. यातून उघडउघड दिसून येतं की सरकारी आरोग्यसेवा दुष्काळासारख्या कठीण परिस्थितीतही महिलांपासून लांबच राहिली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉक्टर दवाखान्यात नसतातच आणि दवाखान्याची वेळ सकाळी ११ ते ५. या वेळात रोजगार हमीवर काम करणाऱ्या बाया मजुरी बुडवून दवाखान्यात कशा येऊ शकतील? आणि ज्या पोचतात त्यांना तरी तिथे सेवा मिळते का? त्यांना शेजारीच असलेल्या खाजगी दवाखान्यात पाठवलं जातं. सरकारी दवाखान्यात औषधं मोफत मिळायला हवीत पण तिथे साध्या इंजेक्शनचेही २० रु. घेतले जातात असं चित्र आहे. बाकी औषधं बाहेरुन आणायला लागतात. रोज २५ रु.मजुरी मिळणाऱ्या लोकांना हे कसं परवडणार आहे. गावात सरकारी दवाखाना नसल्यातच जमा आहे असं बाया उघडपणे सांगत आहेत.

खाजगी दवाखान्यांनी या परिस्थितीचा पूर्ण फायदा उठवला आहे. उपचार घेणाऱ्यांकडून महिन्याला ५०० ते ५००० रुपयांपर्यंत शुल्क घेतलं जात आहे.

दुष्काळाचं हे चित्र सर्वांच्या समोर कधी येणार आहे? आणि दुष्काळाचं नियोजन आणि निवारण करताना आरोग्याचा मुद्दा कधी हाताळला जाणार आहे? ही सर्व पाहणी करताना प्रा. आरोग्य केंद्राच्या डॉक्टरनी कुठलंही सहाय्य करण्याचं नाकारलं यातूनच आरोग्यसेवांची निष्क्रियता दिसून येते.

साताऱ्यातल्या ३ गावांची परिस्थिती संपूर्ण दुष्काळी भागाचीच एक झलक मानता येईल. या सर्व पाहणीतून आरोग्यसेवांबाबत काही मागण्या पुढे आल्या आहेत.

- ◈ रोहयोच्या कामाच्या वेळांनुसार दवाखान्यात उपचार.
- ◈ कामावरच सर्वांची तपासणी आणि आवश्यक उपचार.
- ◈ आरोग्य केंद्राच्या डॉक्टरची आठवड्यातून एकदा भेट.
- ◈ या भेटींचं कॅलेंडर ठरवून त्याची देखरेख केली जावी.
- ◈ जर एखाद्या महिलेला अशक्तपणामुळे किंवा सांधेदुखी, अंग बाहेर येण्याशी संबंधित आजारपणामुळे कामावर घेतलं गेलं नसल्यास रोजगार भत्ता दिला जावा.

साताऱ्यात बायांनी प्रशासनावर दबाव टाकला म्हणून जानेवारीपासून न मिळालेला गहू एप्रिलमध्ये तरी मिळाला.

आपलं राज्य शासन खरोखरच 'महाराष्ट्राला आघाडीवर नेणारं शासन' असेल तर दुष्काळाच्या या बाजूकडे, आरोग्याच्या गंभीर मुद्द्याकडे वेळीच लक्ष देऊन त्यासाठी आवश्यक कारवाई करेल. आलेल्या परिस्थितीशी सामावून घेऊन आपली भूमिका योग्यपणे बजावण्याचं आव्हान आरोग्यसेवांपुढे आहे. ते पेलून लोकांच्या, बायांच्या हक्काची सेवा त्यांना मिळेल याकडे ते लक्ष देतील अशी आशा करु या.

# आरोग्य सेवांचे हक्क

## जनसुनवाई : दिनांक ४ जून २००४

### संयोजक- रुग्ण हक्क चळवळ, सांगली, सातारा आणि कोल्हापूर

*“नर्सच्या सांगण्यावरुन कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया करुन घेतली. त्यानंतर दिवस गेले आणि मुलगी झाली. यानंतर डॉक्टर म्हणाले म्हणून परत ऑपरेशन करुन घेतलं पण परत दिवस गेले आणि मुलगी झाली. तुम्हीच सांगा या मुलींचा सांभाळ कसा करायचा आणि या डॉक्टरांवर विश्वास कसा ठेवायचा?”*

सांगली येथे दिनांक ४ जून २००४ रोजी भरलेल्या जनसुनवाईमध्ये हिंगणगावच्या (ता. कवठेमहांकाळ, सांगली) संगीता कोळेकर आपली कैफियत मांडत होत्या. याच वेळी रुग्ण हक्क चळवळीची सुरुवात झाल्याचं जाहीर करण्यात आलं. कार्यक्रम सांगली जिल्हाधिकारी प्रांगणात घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी सरकारी प्रतिनिधी व लोक प्रतिनिधी आणि जनसमुदाय उपस्थित होता.

रुणसेवेच्या हक्कात एच आय व्ही रुग्णांचा समावेश होणं गरजेचे आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आरोग्य सेवेचा हक्क मिळविण्यासाठी रुग हक्क चळवळीच्या माध्यमातून शासनाला मार्गदर्शन करणारी रुगहक्कांची यादी सांगलीतूनच तयार करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

आरोग्यसेवा नाकारल्याच्या गंभीर घटना इथे मांडण्यात आल्या. औषधं उपलब्ध नसणे, आरोग्य कर्मचाऱ्यांनी चांगली वागणूक न देणे असे अनुभव पुढे आले. यावेळी डॉ. अरुण पोळ व डॉ. जे टी खरमाटे (सरकारी आरोग्य अधिकारी), मिलिंद म्हैसकर (आयुक्त, सांगली), ॲड. दत्ताजी माने, डॉ. ध्रुव मंकड, ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. अनंत फडके, प्रकाश यादव, तासगाव, अच्युत कुलकर्णी, येरळा, व दीपक भोसले आदी उपस्थित होते.

रुग व वैद्यकीय यंत्रणांमध्ये सुसंवाद, औषध प्रणाली ठरविण्याचा रुगाला अधिकार, नागरिक म्हणून समानतेची वागणूक, रुगाबाबत गुप्तता पाळली पाहिजे, अशा रुग हक्क चळवळीच्या मागण्या आहेत.

शासकीय आरोग्य सेवेची बाजू मांडताना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. खरमाटे यांनी लोकांना आपल्या आरोग्याचे जसे अधिकार आहेत तसेच त्यांची जबाबदारी आहे असे मत व्यक्त केले. याशिवाय आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी जनतेने सहकार्य करावे, असे आवाहन केले. प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जा सुधारण्यासाठी व व्यवस्थित औषधोपचारासाठी प्रयत्न करु असे आश्वासनही दिले.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अरुण पोळ यांनी सांगितले की, जनसुनवाईत आलेल्या तक्रारींची वस्तुस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल.

जनतेच्या वतीने बोलताना ॲड. दत्ताजी ताने, डॉ. ध्रुव मंकड, ॲड.पाटील व अशोक यादव यांनी रुणांच्या हक्कांविषयी मते मांडली.

संग्रामच्या मीना शेषू यांनी सांगितले की तपासणी करताना रुगावर उपकार करत असल्याची भूमिका डॉक्टरांनी थांबवावी. रुगाला त्यांच्या हक्कांची माहिती नाही या परिस्थितीत ते लढा देऊ शकत नाहीत त्यांना हक्कांची जाणीव व्हावी यासाठी बायकांची शक्ती वापरुन ही चळवळ पुढे नेऊ व रुग हक्क चळवळीच्या वतीने संग्राम व इतर संस्थाच्या सहकार्याने सांगलीतूनच सरकारला मार्गदर्शक ठरेल. अशी रुगहक्कांची यादी लवकरच तयार करण्यात येईल अशी माहिती त्यांनी दिली व सर्व उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

या जनसुनवाईस विविध संघटनांच्या पदाधिकारी तसेच वेश्या अन्याय मुक्ती परिषदेच्या असंख्य कार्यकर्त्या व नागरिक उपस्थित होते.

**रुग्ण हक्क चळवळ - सांगली, सातारा, कोल्हापूर**
**c/o संग्राम - संपदा ग्रामीण महिला संस्था**
**आरोहन, घनश्यामनगर, माधवनगर रोड, सांगली**

# शेवगा



शेवग्याचं झाड कोणाला माहिती नाही? पण त्याचे औषधी उपयोग मात्र सगळ्यांना माहित असतात असं नाही. शेवग्याचं झाड आठ नऊ मीटरपर्यंत वाढू शकतं. त्याला बारीक संयुक्त पानं येतात आणि फुलं पांढरी असतात. शेवगा कोरडवाहू जमिनीत आणि कमी पाण्यावरही तगून राहू शकतो.

शेवग्याच्या सर्व भागांचे – पानं, शेंगा, बिया, फुलं, डिंक, साल – उपयोग आहेत. त्यातून लोह,कॅल्शियम, प्रथिनं आणि अ जीवनसत्त्वं मिळू शकतात. आदिवासी औषधपद्धतीत आणि आयुर्वेदात शेवग्याचे वेगवेगळे उपयोग केलेले आढळतात. त्यातील काही या अंकात देत आहोत. तुमच्या भागातील इतर उपयोग आम्हाला निश्चित कळवा.

**उपचार**

- सांधे सूज - पानांचे पोटीस करुन बांधावे
- मान अवघडली असल्यास-चार बोटं लांब व चार बोटं रुंद असे पाच-सहा सालींचे तुकडे गंधासारखे चांगले वाटावे या गंधाचा लेप आजार बरा होईपर्यंत सकाळ-संध्याकाळ लावावा.
- लकवा- सालीच्या बारीक पट्ट्या काढून, गरम करुन जिथे लकवा झाला असेल त्या भागाला बांधाव्या. सात दिवस ते बँडेज तसेच राहू द्यावे आणि मग काढून टाकावे. सात दिवसांआधी हे बँडेज अजिबात काढू नये.
- चमक, दुखत असल्यास-शेवग्याचे तेल चोळावे
- सूज आल्यास- साल उगाळून लेप करावा. पाला वाटून एरंडतेलातून लेप द्यावा. साल उगाळून लावल्यास गळू बसायला मदत होते.
- डोळ्यातून सारखे पाणी येत असल्यास पाल्याचा रस मधात मिसळून अंजन तयार करावे.
- कान फुटला असल्या‍‍‍‍‍‍‍‍‍‍‍‍‍‍‍‍'' - फुलं वाळवून वस्त्रगाळ करुन पूड करुन कानात टाकावी.
- जंत झाल्यास झाडाची साल घेऊन बारीक वाटावी. त्यात चार कप पाणी घालून एक होईपर्यंत ती उकळावी.काढा थंड करावा रोज सकाळी अनशा पोटी एक कप याप्रमाणे तीन दिवस घ्यावा.
- नारुवर शेवग्याची साल, मूळ कुटून बांधतात.
- खवडयावर पानांचा रस लावतात.
- गंडमाळेवर शेवग्याचा चीक, पांढऱ्या गुलबक्षीचा कंद आणि मिरी थंड पाण्यात उगाळून लेप करुन लावतात.
- विंचू डसल्यास झाडाचा डिंक दगडावर थोडे पाणी टाकून उगाळावा व त्याचे गंध करुन डसलेल्या ठिकाणी एकदाच लावावे.
- दम्यामध्ये झाडाची साल पाण्यात उकळून त्याचा वाफारा घेतात.

संदर्भ

डॉ.परांजपे *अंगणातला वैद्य* IIE, पुणे १९९४

डॉ. त्रिभुवन व इतर *आदिवासी औषध परंपराःओळख आणि विकास*, वैद्य नानल आयुर्वेद फौंडेशन, २०००

डॉ.मारी डिसोझा (संक), *आदिवासी दवादारू*, सोशल सेंटर, १९९८

# २८ मे आंतरराष्ट्रीय महिला स्वास्थ्य कृती दिन

## स्त्रियांचा आरोग्य अधिकार परिषद, सातारा

जगभर २८ मे हा दिवस महिला स्वास्थ्य कृती दिन म्हणून साजरा केला जातो. तथापिने इतर १६ संस्था-संघटनेसोबत हा दिवस **स्त्रियांचा आरोग्य अधिकार परिषद** भरवून महिलाविरोधी भेदभाव निर्मूलनाच्या सीडॉ कराराची व त्यातील आरोग्यबाबतच्या कलम १२ ची अंमलबजावणी व्हावी या मागणीसह हा दिवस साजरा केला. या परिषदेचं आयोजन साताऱ्याच्या दलित महिला विकास मंडळ या संघटनेनं केलं होतं.

परिषदेआधी महाराष्ट्रात ५ विभागीय कार्यशाळा झाल्या ज्यात सीडॉ करार आणि हक्कांचा दृष्टीकोन समजून घेऊन सीडॉच्या अंमलबजावणीमधली आपली भूमिका समजून घेण्यात आली. १६ संस्थापैकी प्रत्येकीने आरोग्यसेवांच्या पाहणीसाठी रक्तपांढरी, गर्भपात, गरोदरपण/प्रसूती/बाळंतपणाच्या सेवा, प्रजननमार्गाचे विकार यातील किमान एक विषय निवडला होता. तसंच स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराची आणि संबंधित आरोग्यसेवांची पाहणी करण्यात आली.

सकाळचं सत्र ११.३० वाजता सुरु झालं दलित महिला विकास मंडळ आणि तथापितर्फे सर्वांचं स्वागत करण्यात आलं. आजची परिषद भरवण्यामागचं कारण सांगितल्यानंतर सर्व जणांनी स्वतःची ओळख करून दिली. नंतर पाहणीतून निघालेल्या निष्कर्षांची मांडणी करण्यात आली. या मांडणीतून गडचिरोली यवतमाळ, सांगली, मुंबई, अमरावती आणि सातारा जिल्ह्यातल्या स्त्रियांना आरोग्याची स्थिती काय आहे हे पुढे आलं. सात संस्थांनी पत्राने आपली माहिती पाठविली होती. तीही मांडण्यात आली. दुष्काळ आणि स्त्रियांचं आरोग्य व आरोग्यसेवांबाबतही मांडणी झाली. पाहणीतले प्रमुख मुद्दे

१. रक्तपांढरीचं प्रमाण सुमारे ७०% असूनही लोहाच्या गोळ्या फक्त गरोदर बायकांना.

२. गरोदरपणात सेवांमध्ये शारीरिक तपासणीचं प्रमाण खूपच कमी, रक्तदाब मोजणी यंत्रं उपलब्ध नाहीत. प्राथमिक आरोग्य केंद्रांमधून प्रसूती सेवा नाहीत. प्रशिक्षित व्यक्तीकडून प्रसूतीचं प्रमाण अत्यल्प. बाळंतपणानंतरच्या सेवा जवळ जवळ नाहीत.

३. हिंसाचाराचं प्रमाण सगळीकडे वाढतं. आरोग्यसेवांकडून नोंदणी आणि मदत नाही. हिंसाचाराचे प्रकार क्रूर आणि मानसिक छळाच्या प्रमाणात वाढ.

४. राज्यात पडलेल्या दुष्काळाचे स्त्रियांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम. आरोग्यसेवांकडून विशेष प्रयत्न नाहीत.

सर्व सहभागींनी सांगितलं की, प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतरच स्त्रियांच्या आरोग्याबाबतचं वास्तव चित्र ठळकपणे उभं राहिलं. यानंतर स्थानिक पातळीवर सीडॉ कराराचा कसा उपयोग करता येईल यावर चर्चा झाली. आणि सीडॉ कराराबाबत माहिती देणारं एक सादरीकरण सहभागी संस्थांना देण्यात आलं. आपापल्या भागात त्याचा उपयोग करुन काही कार्यक्रम घ्यावेत असा विचारही मांडण्यात आला.

दुपारच्या सत्रात दलित महिला विकास मंडळाच्या वर्षा देशपांडे यांनी न्यायव्यवस्था आणि हक्कांच्या चळवळीसाठी कोर्टाचा वापर यावर आपले विचार मांडले. दारुबंदी किंवा गर्भलिंग निदान तंत्राच्या कायद्यातील तफावत, रोहयोच्या वेतनाबद्दलही त्यांनी ताशेरे ओढले. यानंतर ऑड्री फर्नांडिस यांनी सीडॉ प्रशिक्षणं आणि त्यातील अनुभव मांडले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दत्ता देसाई यांनी कार्यक्षम आरोग्यसेवांसाठी जन आंदोलन उभारण्याची गरज व्यक्त केली. लोकांचे खरे मुद्दे, गरजा पुढे आल्या पाहिजेत आणि फसव्या भारत उदयाच्या चित्रांचा विरोध व्हायला हवा. ॲड. धैर्यशील पाटील यांनी आरोग्य, शिक्षण, काम ही घटनेच्या मार्गदर्शक तत्वातली कलमं अधिकारात बदलायची गरज व्यक्त केली. देशाची आर्थिक सामाजिक घडी बदलण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं.



यानंतर सातारा शहरात पदयात्रा काढण्यात आली. राजवाड्यापाशी सर्व कार्यकर्त्यांनी समानतेच्या तत्वाशी बांधील राहत स्त्रियांच्या आरोग्याचा अधिकार मिळविण्यासाठी कार्यरत राहण्याची शपथ घेतली.

**सहभागी संस्था**

आम्ही आमच्या आरोग्यासाठी, गडचिरोली

मातोश्री बारनबाई बहूद्देशीय संस्था, गडचिरोली

अस्मिता इन्स्टिट्यूट फॉर डेव्हलपमेंट,यवतमाळ

मुक्ताबाई ग्रामीण विकास संस्था, यवतमाळ

अर्पिता बहूद्देशीय संस्था, अमरावती

संग्राम, सांगली

कोरो साक्षरता समिती, मुंबई

दलित महिला विकास मंडळ, सातारा

तथापि ट्रस्ट, पुणे

# 'मुक्ता' - गर्भपाताच्या सेवांविषयी समर्थन कार्यशाळा

स्त्रियांसाठी चांगली, परवडणारी आरोग्यसेवा आणि सुरक्षित गर्भपाताची सेवा मिळावी या मागणीसाठी २९ मे २००४ रोजी ही सेहत संस्थेने एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली. २८ मेला साजरा होणाऱ्या महिला स्वास्थ कृती दिनाच्या निमित्ताने ही कार्यशाळा घेण्यात आली.

कार्यक्रमाला एकूण ८० कार्यकर्ते उपस्थित होते. सकाळच्या सत्रात जया वेलणकर यांनी स्त्री चळवळीने उठवलेले आरोग्याचे मुद्दे आणि त्यामागचा दृष्टीकोन याचा गोषवारा मांडला. स्त्री केंद्रित धोरणं आणि सेवांचा दर्जा सुधारण्यासाठी संसाधनांची पुरेशी तरतूद आवश्यक असल्याचं त्यांनी सांगितलं.

आरोग्य कार्यकर्ते आणि प्रशिक्षक डॉ. मोहन देशपांडे यांनी स्त्रियांसाठी चांगल्या आरोग्य सेवा मिळण्यामध्ये असणाऱ्या पुरुषांच्या भूमिकेविषयी आपली मतं मांडली. स्त्रियांच्या आरोग्याच्या गरजांबाबत पुरुष जास्तच असंवेदनशील बनत आहेत आणि म्हणूनच त्यांना याबाबत जागरुक करणं आणि सामील करुन घेणं महत्वाचं आहे असं ते म्हणाले. सेहतच्या कामायनीने स्त्री लिंगी गर्भपाताविरोधी आंदोलनाची मांडणी केली. भाभा हॉस्पिटलच्या निरीक्षक डॉ सीमा मलिक यांनी दिलासा हे आधारगृह हिंसाचार पिडीत स्त्रियांसाठीचं आधारगृह सुरु करण्यामागची संकल्पना मांडली. बृहन्मुंबई मनपा रुग्णालयात हे केंद्र चालविण्याचे आपले अनुभवही त्यांनी मांडले.

दुपारच्या सत्रात विभागीय कार्यशाळा आयोजित करणाऱ्या सदस्यांनी सध्याच्या आरोग्यसेवा आणि त्यासंबंधीच्या मागण्यांची मांडणी केली. सुनीता गांधी (कोकण), शुभदा देशमुख (विदर्भ), डॉ पंकज गांधी (पश्चिम महाराष्ट्र) आणि राधा मोगडेवार (मराठवाडा) यांनी यात भाग घेतला.गर्भपाताच्या सुविधा आरोग्य केंद्राची स्थिती, कुटुंब कल्याण कार्यक्रमाचा ताण अंमलबजावणीबाबत त्यांनी आपापल्या विभागातून माहिती सादर केली. या स्थितीबाबतचे सर्व सदस्यांनी सहया केलेले एक मागणीपत्र यावेळी उपस्थित सरकारी अधिकारी, डॉ बेळंबे (अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण) व डॉ. चितळे (उप संचालक, कुटुंब कल्याण) यांना सादर करण्यात आलं. त्याबाबत लक्ष घालून योग्य ती कारवाई करण्याचं त्यांनी मान्य केलं. गर्भलिंगनिदान तंत्राचा वापर आणि स्त्रीलिंगी गर्भपाताचा निषेध करणारं पत्रही डॉ बेळंबे यांना देण्यात आलं.

मुक्ता टीममधील छायाचित्रकार विद्या कुलकर्णी यांच बिनमोल श्रम हे छायाचित्र प्रदर्शन मांडण्यात आलं. सहभागींनी तयार केलेल्या स्त्रीलिंगी गर्भपाताचा निषेध करणाऱ्या काही पोस्टर्सना यावेळी पारितोषिकं देण्यात आली.

# गर्भनिरोधकांची ओळख -भाग २ : निरोध

*शहाजी दरवर्षीप्रमाणे गणपतीसाठी मुंबईहून त्याच्या गावी चालला होता. नुकतंच त्याच्या बायकोचं पत्र आलं होतं त्यामुळे तो थोडा उदास होता. तीन मुलांचं करता करता तिची धावपळ होत होती. तिला खूपच थकून गेली होती आणि चौथं तान्हं मूल वारल्यानं ती खूपच दुःखी होती. शहाजीलाही कळत होतं की कुठेतरी त्याची बायको त्याला विनवत होती की मला परत मूल नकोय. कळत नव्हतं काय करावं?*

मागच्या अंकात आपण तांबीची माहिती घेतली आणि आपल्या काही मित्रांचे गर्भनिरोधनाबद्दलचे विचारही वाचले. बहुतेकांचं म्हणणं हेच होतं की पुरुषांनी गर्भनिरोधक वापरावं. त्यांचे विचार मनात ठेवून या अंकात आपण निरोधची माहिती घेऊ.


कोणतंही गर्भनिरोधक निवडताना, गर्भधारणा टाळणं हा महत्त्वाचा निकष असतो पण त्याचबरोबर त्याचे दुष्परिणाम, लिंगसांसर्गिक आजारांपासून संरक्षण, उपलब्धता, खर्च आणि ते वापरणं सोयीचं आहे का हे पाहणंही तितकंच गरजेचं आहे. निरोध या सर्वच कसोट्यांमध्ये आघाडीवर आहे. कसा ते पाहूच.

**निरोध काय आहे?**

निरोध म्हणजे लिंगावर बसवायचं पातळ रबरी आवरण असतं ज्यामध्ये वीर्यपातानंतर वीर्य जमा होतं. पाकिटामध्ये निरोध गुंडाळून ठेवलेला असतो आणि त्यात काही शुक्राणु- नाशक पदार्थ किंवा वंगण लावलेलं असतं. निरोधला बरीच नावं आहेत. कंडोम, रबर, फुगा, इत्यादी.

**निरोध कसा काम करतो?**

निरोध पुरुषाच्या लिंगावर घट्ट बसतो आणि वीर्य स्त्रीच्या योनीत पोचू शकत नाही त्यामुळे पुढे जाऊन शुक्राणुचे स्त्रीबीजाशी मिलन व गर्भधारणा टळते. प्रत्येक शरीरासंबंधाच्या वेळी निरोधचा वापर करायला पाहिजे.



**गर्भधारणा रोखण्यासाठी निरोध किती उपयोगी आहे?**

हे तुम्ही किती काळजी घेता यावर अवलंबून आहे. अगदी नीट वापरल्यास निरोधचा प्रभाव ९७ ते ९९% आहे. म्हणजे वर्षभर निरोध वापरल्यास १०० पैकी १ ते ३ बायकांनाच दिवस जाऊ शकतात. पण प्रत्यक्षात इतकी काळजी घेतली जात नाही. त्यामुळे त्याचा प्रभाव कमी होतो (८६ ते ९०%). निरोधसोबत शुक्राणुनाशक वापरल्यास त्याचा प्रभाव वाढतो. एकमेकांशी बोलून, विश्वासात घेऊन त्याचा वापर केल्यास जास्त फायदा होतो.


**निरोध वापरण्याचे फायदे काय?**


- गर्भधारणा टाळण्याचा खात्रीशीर उपाय
- लिंगसांसर्गिक आजार जसे (क्लॅमिडिया, सिफिलिस, गनोरिया, एच आय व्ही, ब वर्गीय कावीळ, नागीण, इत्यादी) टाळण्यासाठी एकमेव गर्भनिरोधक,
- दुष्परिणाम कमी
- वैद्यकीय तपासणी, डॉक्टरच्या सल्ल्याची गरज नाही
- स्वस्त, बाळगायला सोपा,
- वापरताना लिंग जास्त काळ ताठर राहू शकतं.

निरोध सरकारी आरोग्य केंद्रात, आरोग्यसेवकांकडे मोफत मिळतात. औषधाच्या दुकानात, पानपट्टीवरही निरोध विकले जातात. निरोध आणणं ही जबाबदारी आहे. त्यात लाज कसली?

### निरोध कसा वापरतात?




लिंगावर बसवण्याआधी निरोध उलगडू नका. लिंग ताठर झाल्यावर निरोधचं पुढचं टोक चिमटीत धरुन (वीर्यासाठी थोडी जागा ठेवून) लिंगावर निरोध बसवा. लिंग पूर्णपणे झाकलं गेलं पाहिजे. पण निरोध कधीही ताणून ओढू नका. निरोध ओला करण्यासाठी लाळेचा किंवा वंगणाचा वापर करता येतो पण तेल किंवा इतर स्निग्ध पदार्थ वापरु नयेत त्यामुळे रबर विरघळू शकते.

वीर्यपातानंतर योनीतून लिंग बाहेर काढण्याआधी ते शिथिल होण्याआधी निरोध व्यवस्थित धरुन ठेवा. त्यामुळे त्यातून वीर्य बाहेर पडणार नाही. दरवेळी नवा निरोध वापरा आणि नीट विल्हेवाट लावा. तो धुऊन परत वापरु नका.

### निरोध वापरताना काही अडचणी येतात का?

पुरुषांसाठी निरोध वापरणं नेहमीच सोपं नसतं. येऊ शकणाऱ्या काही अडचणी पुढीलप्रमाणे -

◈विसरणे, उशीरा वापरणे, फाटणे, मध्येच निघून येणे

◈बऱ्याच पुरुषांना व काही बायकांना निरोध आवडत नाही.

◈बऱ्याच जणांना लैंगिक आनंद कमी होतो असं वाटतं, पण काही जणांना जोडीदाराला जंतुलागण किंवा गर्भधारणा होऊ नये म्हणून त्याचा वापर जास्त महत्वाचा वाटतो.

◈काही पुरुषांना लिंग निरोध मुळे ताठर ठेवता येत नाही.

◈क्वचित प्रसंगी काही स्त्री पुरुषांना रबर किंवा शुक्राणुनाशकांमुळे ॲलर्जी येऊ शकते.

या झाल्या वापराबद्दलच्या अडचणी. पण खरी अडचण दृष्टीकोनाची आहे. निरोधचा वापरामुळे लैंगिक आनंद कमी होतो किंवा पुरुषांने गर्भनिरोधक का वापरायचं, अशा विचारामुळे निरोधचा वापर केला जात नाही.

खरं तर निरोधच्या वापराने गर्भधारणा होणार नाही याची खात्री असल्याने शरीरसंबंध आणि परस्परांच्या नात्यामध्ये खुलेपणा किंवा मोकळेपणा येऊ शकतो.

**पुरुष गर्भनिरोधन करतात?**

◈ गर्भनिरोधन करणाऱ्या दर तीनापैकी एक, पुरुष गर्भनिरोधक पद्धत (निरोध, नसबंदी) वापरतो.

◈ ३.७ कोटी पुरुष निरोध वापरतात

◈ ३.५ कोटी पुरुषांनी नसबंदी करुन घेतली आहे.

◈ गर्भनिरोधक वापरणाऱ्या लोकांमध्ये अमेरिकेत दर पाचातला एक व्यक्ती, इटलीत दोनातला एक जण पुरुष पद्धत वापरतो. तर जपानमध्ये हे प्रमाण पाचात चार इतकं आहे.

संदर्भ: स्टोक्स, *मेन ॲण्ड फॅमिली प्लॅनिंग*, वर्ल्डवॉच

एकमेकांसाठी सुरक्षित गर्भनिरोधन पद्धतींचा विचार करताना निरोध ही फार महत्वाची पद्धत आहे. सध्या तरी फक्त पुरुषांसाठीचे निरोध आपल्याकडे उपलब्ध आहेत. स्त्रियांसाठीचा निरोध उपलब्ध नाही. काही वर्षापूर्वी सरकारने त्याचा उपयोग करण्यासाठी प्रयोगही केले होते. स्त्रियांचा निरोध स्त्रियांच्या हातात नियंत्रण असणारं गर्भनिरोधक ठरु शकेल का? तुमचं काय मत आहे?

या सदराबद्दल किंवा माहितीबद्दल तुमचे विचार , अनुभव आम्हाला नक्की कळवा. तसंच एखाद्या गर्भनिरोधक पद्धतीबद्दल तुम्हाला काही अडचणी असतील तर त्याबाबत मदत करण्यास किंवा सल्ला देण्यास आम्ही तयार आहोत. तुमच्या शंका किंवा सूचना तथापिच्या पत्त्यावर जरुर कळवा.

संदर्भ:


*कॉंडोम्स ॲण्ड सेक्शुअली ॲक्टिव्ह यूथ.* फिंगर, प्रिबिला, यूथलेन्स ५, मार्च २००३.

*द कॉण्डोम* कॉन्ट्रासेप्टिव्ह टेक्नॉलॉजी १९८६-८७. रॉबर्ट हॅचर आणि इतर, १९८७.

*थाबोज होमकमिंग* दूरशिक्षण केंद्र, लेसोथो फॅमिली प्लॅनिंग असो., १९७७

स्त्रियांच्या आरोग्यासाठी महत्त्वाच्या असणाऱ्या आरोग्यसेवांपैकी एक म्हणजे गर्भपाताची सेवा. गर्भपात हा कोणत्याही स्त्रीचा अधिकार आहे. पण आरोग्यसेवा मात्र त्यांचा आदर राखत नाहीत. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागातून केलेल्या पाहण्यांमधून असं दिसून आलंय् की सरकारी आणि खाजगी दवाखान्यात गर्भपातासाठी नवऱ्याची सही मागितली जाते. सेहत संस्थेने केलेल्या पाहणीतून असं दिसतं की जवळ जवळ ८७% गर्भपाताच्या वेळी बाईला नवऱ्याची सही मागितली गेली. याविरोधात शासन निर्णय (जी. आर.)असूनही त्याची दखल घेतली जात नाही. तरी जिथे जिथे अशी सही मागितली जाते त्याचा विरोध करण्यासाठी हा शासन निर्णय या अंकात देत आहोत.

परिपत्रक

क्र.संआसे/गर्भपात मान्यता/क्र-१९/२०००, दि.२२/११/२०००

डॉ सुभाष साळुंखे
आरोग्य सेवा महासंचालक, डी पी एच, डी आय एच
शासकीय दंत महाविद्यालय इमारत, ४ था मजला,
सेंट जार्जस रुग्णालय आवार, पी डिमेली रोड,
मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी- २६२१००६ (वै)
२६२१०३१-३५(का)
फॅक्स- ०२२-२६७४४८०
ई मेल- dir001@vsnl.net

प्रति,
१. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, ...(सर्व)
२.उपसंचालक, आरोग्य सेवा, ...(मंडळ)...

**विषय- वैद्यकीय गर्भपात कायद्याच्या (१९७१) अंमलबजावणीबाबत...**

उपरोक्त विषयासंदर्भात आपले लक्ष वैद्यकीय कायदा,१९७१ मधील नियम ३ भाग ४ (ए) व (बी) कडे वेधण्यात येत आहे. वैद्यकीय गर्भपात कायद्यातील केलेल्या सदर तरतुदीनुसार गर्भपात करण्यापूर्वी संबंधित गरोदर स्त्रीची गर्भपातास लेखी संमती घेणे आवश्यक आहे. जर सदर स्त्री १८ वर्षाच्या खालील किंवा मानसिकदृष्ट्या सक्षम नसेल तर तिच्या पालकांची लेखी संमती घेणे बंधनकारक आहे.

याबाबत असे निदर्शनास आले आहे की, बरेचदा गर्भपात करण्यापूर्वी तिच्या पतीची संमती असावी असा आग्रह धरला जातो. वरील नियमातील तरतूद पाहता गर्भपात करण्यापूर्वी स्त्रीची संमती पुरेशी असून तिच्या पतीच्या संमतीची आवश्यकता नाही. **सबब गर्भपात करण्याकरिता पतीच्या संमतीचा आग्रह करु नये.**

तरी याबाबत आपल्या अधिपत्याखालील रुग्णालयातून गर्भपाताच्या शस्त्रक्रिया करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना वरील प्रमाणे नियमांचे आधीन राहून कार्यवाही करणाच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच खाजगी रुग्णालयांनादेखील याबाबतची कार्यवाही करण्याचा आग्रह धरावा.

डॉ. सुभाष साळूंखे, महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई

# आलोचना

आलोचना हे स्त्री विषयक संसाधन, संग्रहण आणि संशोधन केंद्र आहे. १९८९ मध्ये महाराष्ट्रातील पाच स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी आलोचनाची स्थापना केली. स्त्री चळवळ व स्त्रीवादी अभ्यासक यांना आवश्यक अशा स्त्रीजीवनाच्या विविध पैलूंची माहिती उपलब्ध करून देण्याच्या गरजेतून आलोचनाची सुरुवात झाली.

इंग्रजी व मराठी भाषेतील ३००० हून अधिक पुस्तके ग्रंथालयात आहेत. पुस्तकांशिवाय विविध अहवाल, मासिके, पोस्टर्स, पत्रके, छायाचित्रे, व्हिडीओ फिल्म्स संग्रह आणि एकूण ७० हून अधिक विषयावर इंग्रजी व मराठी वृत्तपत्रातून निवडलेल्या कात्रणांचा संग्रह आहे.

**प्रकाशने:**

◈ पंचायत राज आणि आपण
◈ राजकारणाच्या अंगणातील स्त्रियांची भरारी
◈ सामर्थ्य आहे चळवळीचे
◈ गावकीत आपुल्या ठरलंच हाय (गाण्याची पुस्तिका)

**प्रशिक्षणासाठी:**

◈ प्रकाशवाटा (महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा मागोवा)
◈ दलित स्त्री अस्मितेचा आविष्कार
◈ मग भाकऱ्या कोण करणार?
◈ पंचायत राज पोस्टर संच
◈ कहाणी नानीच्या बिटरगावची - स्लाईड शो आणि व्हिडिओ कॅसेट






स्त्रिया आणि हिंसा
१० पोस्टर्स संच
रु. १६० फक्त.

**पत्ता:**
**आलोचना, सनलिट अपार्टमेंट, पहिला मजला, प्रभातनगर, फिल्म इन्स्टिट्यूट समोरील गल्ली, पुणे ४११ ००४**
**फोन नं - ०२०-२५४४४१२२,** email - aalochana@vsnl.com

## शहरी आरोग्यावर कार्यशाळा

महाराष्ट्रात जवळजवळ ४५ टक्के लोक शहरांमध्ये राहतात. तरी त्यासाठी कोणतंही सर्वंकष शहरी आरोग्य धोरण मात्र अस्तित्वात नाही. इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ मॅनेजमेंट पाचोड (IHMP) पुणे या संदर्भात शहरी आरोग्याचे मुद्दे समजून घेण्याकरता एक दिवसाची कार्यशाळा आयोजित करत आहे. या कार्यशाळेत मुख्यतः निधीची तरतद, आजार आणि साथींसाठी प्रतिबंधात्मक उपाय, औषध पुरवठा आणि विकेंद्रीकरण इत्यादी विषय हाताळले जातील.

जे शहरी भागात काम करत आहेत आणि या विषयात ज्यांना रस आहे त्यांनी आय एच एम पी शी संपर्क साधावा. कार्यशाळा जुलै अखेर किंवा ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात होईल.

**आय एच एम पी, पुणे**
सर्व्हे क्र. २/३२/२, सोनाई पार्कजवळ,
खराडी, पुणे - ४११०१४
दूरध्वनी- ०२० २७०११९८६, २७०१२५६२

# खोक्ली माय

हिवायाचं थंड वारं
बोरी पिकल्या रानात
आली जयगावामधी
आली खोकल्याची सात

रस्त्यावर वावरात
लोक खोकतात येडे
घरोघरी खोकलनं
जसे वाजती चौघडे

अरे, घेतले औसद
नही राहे कुठे बाकी
तरी जायेना खोकला
सर्व वैद्य गेले थकी

सर्व वैद्य गेले थकी
आता जावं कुठे तरी
करे मनात इचार
कोनी गावाचा कैवारी

अरे, गावाचा कैवारी
होता मोठा हिकमती
मेहेरुनच्या रस्त्यानं जात
व्हता कुठे शेती

कसा आला रे खोकला
म्हने अवंदाच्या साली
गावाच्याच शिववर
कोणी म्हातारी भेटली

तशी म्हातारी बोलली
काही धर्म वाढ बापा
इडापीडा या गावाची
व्हई जाईन रे सपा

तव्हा गावाचा कैवारी
काय बोले म्हातारीले
माझ्या गावाचा खोकला
सर्व दान केला तुल

ऐकीसनी म्हातारी बी
तव्हा पडे भरमात
म्हने घेनंच पडीन
दान आलं जे कर्मात

मंग घेतला खोकला
सर्व गाव झाडीसनी
आन बसे खोकलत
सदा गया खल्लीसनी

गेला गेला सर्वा निंघी
गावामधला खोकला
असा खोकल्याचा वाटा
म्हातारीन उचलला

खोक्ला निंधी जायासाठी
धर्ती म्हातारीचे पाय
हात जोडती रे लोक
खोक्ली माय खोक्ली माय

मेहेरुनच्या वाटेनं
जरा वयव रे पाय
तुला दिशीन रस्त्याले
तठे आता खोक्ली माय!

- बहिणाबाई चौधरी

बहिणाईची गाणी
सुचित्रा प्रकाशन, मुंबई
आठवी आवृत्ती - २००२

RNI.MAHMAR25017/13/1/2003-TC No. PHM/SR/242/V III 2003

**PRINTED MATTER**

बुक पोस्ट

परत पाठवायचा पत्ता
तथापि ट्रस्ट,
४२५ डी पी- ७७, टि म वि कॉलनी,
मुकुंद नगर, पुणे ४११०३७
दूरध्वनी : ०२० - २४२७०६५९
Email: tathapi@vsnl.com

प्रति
**ज्ञानप्रबोधिनी**
**मु. पो. खेड-शिवापूर,**
**पुणे.**

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

डॉ. मीरा सदगोपाल ह्या अंकाच्या मालक संपादक व प्रकाशक असून ते रेणूप्रकाश अ, ८१७ सदाशिव पेठ पुणे -३०, महाराष्ट्र येथे प्रसिध्द झाले असून त्याचे मुद्रण प्रभात प्रिंटिंग प्रेस, ४२७, गुलटेकडी पुणे ३७ येथे झाले आहे.

आभार - वंदना कुलकर्णी

खाजगी वितरणासाठी